शासनाने वितरीत केलेल्या अनुदानापैकी अखर्चित निधी खर्च करण्याबाबतची कार्यप्रणाली.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक:- संकिर्ण-१०.१७//प्र.क्र.६४/अर्थोपाय
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २१ सप्टेंबर, २०१७

<u>वाचा</u>:- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकिर्ण -१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि.०६ जून, २००८.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकिर्ण -१०.१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय, दि. २५ ऑगस्ट, २०१५.

<u>प्रस्तावना:-</u>

राज्य शासनाने अर्थसंकल्पिय तरतूदीनुसार आर्थिक वर्षात वितरीत केलेला निधी त्या त्या आर्थिक वर्षात खर्च होणे अपेक्षित असून अखर्चित निधी शासनास समर्पित करणे आवश्यक आहे. तथापि, जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांना एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला निधी पूर्णपणे खर्च करतांना येणा-या अडचणी लक्षात घेऊन संदर्भाधीन दि.०६ जून,२००८.च्या शासन निर्णयान्वये शासनाने जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांना एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला व अखर्चित राहीलेला निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षअखेर पर्यंत खर्च करण्याची अनुमती दिलेली आहे. मात्र, पुढील एका आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहीलेला निधी शासनाकडे परत करणे बंधनकारक राहील अशा स्पष्ट सुचना उपरोक्त दि.०६ जून,२००८.च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. असे असूनही शासनाने वितरीत केलेला निधी विहित वेळेत खर्च केला जात नाही व अखर्चित निधी खर्च करण्यास मान्यता देण्याबाबतचे अनेक प्रस्ताव वित्त विभागाकडे प्राप्त होत आहेत.

याबाबत पंचायती राज संस्थांच्या नांदेड जिल्हा परिषदेच्या सन २०११-२०१२ च्या लेख्यांवरील लेखा पुनर्विलोकन अहवालामध्ये पंचायती राज समितीने असे निष्कर्ष काढले आहेत की, राज्य शासनाने जिल्हा परिषदांना एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला निधी पूर्णपणे खर्च करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन सन २००८ च्या शासन निर्णयाव्दारे अखर्चित निधी लगतच्या पुढील वर्षात खर्च करण्याची अनुमती जरी दिलेली असली तरी बहुतांश वेळा आर्थिक वर्ष संपताना माहे मार्च अखेरीस निधी मुक्त केल्यामुळे जिल्हा परिषदांना निधी खर्च करण्यासाठी एकाच वर्षाचा कालावधी मिळतो असे समितीच्या निदर्शनास आले आहे. सन २००८ च्या शासन निर्णयाचा हेतु निर्विवादपणे साध्य करावयाचा असल्यास शासनाने जिल्हा परिषदांना द्यावयाचा निधी एकतर वेळेवर मुक्त करुन द्यावा. अन्यथा, आर्थिक वर्ष अखेरीस म्हणजेच माहे मार्च मध्ये मुक्त केलेला निधी किंवा विलंबाने मुक्त केलेल्या निधीकरिता, निधी मुक्त केल्यापासून निश्चित कालावधीत तो खर्च करण्याचे सुस्पष्टपणे आदेश काढून त्या अन्वये

बंधनकारक करावे तसेच जी कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झाली आहेत व मुदतीनंतर अशा कामांवर खर्च करावयाचा झाल्यास त्याबाबतच्या अधिकारांचे शासनाने विकेंद्रीकरण करुन असे अधिकार विभागीय पातळीवर देण्यासाठी व इतर बाबींसाठी शासनाने दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय केवळ ३१ मार्च, २०१४ पर्यंत अखर्चित राहिलेल्या निधींकरीता असला तरी अशा प्रकारचा सर्वंकष सुधारित शासन निर्णय निर्गमित करुन याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठवावी अशी समितीने शिफारस केलेली आहे. या बाबींचा प्रश्न महानगरपालिका/ नगरपालिका यांचेबाबतही उद्भवण्याची शक्यता असल्याने सदर शिफारशी विचारात घेवून सर्वंकष सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>:-

सन २०१६-१७ मध्ये वितरित केलेला निधी दिनांक ०६ जून, २००८ च्या शासन निर्णयानुसार दिनांक ३१ मार्च २०१८ पर्यंत खर्च करता येईल. मात्र दिनांक ३१ मार्च, २०१६ पूर्वी मुक्त केलेला परंतू अखर्चित असलेल्या निधीसंदर्भात खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत:-

१) प्रशासकीय विभागांनी अशा अखर्चित निधी संदर्भात तात्काळ आढावा घ्यावा. सदर आढावा दि.३० सप्टेबर, २०१७ पर्यंत पूर्ण करण्यात यावा.

२) बांधकामाव्यतिरिक्त (वेतन, अनुदान व सवलती, इत्यादी प्रयोजनासाठी) अखर्चित निधी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ पर्यंत शासनास जमा करण्यात यावा.

३) बांधकामाच्या निधीसंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:-

(३.१) जी कामे भौतिकदृष्टया पूर्ण झाली आहेत व खर्चाच्या परवानगी अभावी देयकाचे प्रदान होऊ शकत नाही, अशा सर्व प्रकरणी दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ पर्यत देयकाचे प्रदान अखर्चित निधीतून करण्याची कार्यवाही पूर्ण करावी. अशा देयकांचे प्रदान करत असताना त्याच कामावर इतर स्त्रोतातून खर्च न झाल्याची खात्री करावी. दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ नंतर अशा कामांसाठीच्या देयकांचे प्रदान करणे, ही बाब वित्तिय अनियमितता म्हणून समजण्यात येईल. सबब दिनांक ३१ मार्च, २०१६ पर्यतचा अखर्चित निधी दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ नंतर शासन खाती जमा करण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रशासकीय प्रमुखांची राहील.

(३.२) जी कामे अद्याप सुरू नाहीत अथवा जी कामे सुरू होऊन अपूर्ण आहेत त्या कामांबाबतचा अखर्चित निधी सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून ८ दिवसांच्या आत शासन खाती जमा करावा.

(३.३) जी कामे अपूर्ण आहेत म्हणजे ज्या कामांच्या निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत, ज्या कामांचे कार्यारंभ आदेश दिलेले आहेत, ज्या कामांचे धावते देयक (Running Bills) दिलेले आहे पण काम पूर्ण झाले नाही, अशी कामे दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत पूर्ण करावीत व या पूर्ण झालेल्या कामांसाठी देयकांचे प्रदान **चालू आर्थिक वर्षातील उपलब्ध तरतुदी मधून** दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत करण्यात यावे.

४) सद्यस्थितीत केंद्र पुरस्कृत योजनांसाठी PFMS प्रणाली कार्यान्वित असून यापुढे राज्य पुरस्कृत तसेच जिल्हा नियोजन योजनांबाबतही PFMS या प्रणालीचा वापर करणे अनिवार्य राहील जेणेकरून कोणत्या स्तरावर योजनांचा निधी अखर्चित आहे ही बाब राज्य स्तरावरूनही पाहता येईल. यामुळे अखर्चित निधीच्या माहितीमध्ये अधिक पारदर्शकता निर्माण होईल.

५) दिनांक ०६ जून, २००८ च्या शासन निर्णयानुसार एखादया आर्थिक वर्षात स्थानिक स्वराज्य संस्थांना मुक्त केलेला निधी लगतच्या पुढील वर्षात खर्च करण्याची अनुमती आहे.तथापि, या विहीत मुदतीनंतरही PFMS या प्रणालीवर अखर्चित दिसत असलेला निधी, त्यापुढील आर्थिक वर्षासाठीचे अर्थसंकल्प तयार करताना विचारात घेण्यात येईल व जितका निधी अखर्चित आहे तितका निधी कमी करून त्या योजनेसाठी अर्थसंकल्पित केला जाईल. प्रशासकीय विभागांनी वार्षिक अर्थसंकल्प तयार करण्यासाठी वित्त विभागाला निधी मागणीचे प्रस्ताव पाठविताना याची नोंद घ्यावी.

६) यापुढे प्रशासकीय विभागांनी संदर्भाधीन दिनांक ०६ जून २००८ च्या शासन निर्णयाप्रमाणे तंतोतंत कार्यवाही करावी.

७) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१७०९२११७४९२८९३०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vaibhav R Rajeghatge

Digitally signed by Vaibhav R Rajeghatge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f453d869c76bb9b100c9474614e3d97070719ea461f32ccfef10b55651861f13, cn=Vaibhav R Rajeghatge
Date: 2017.09.21 17:39:47 +05'30'

(वैभव राजेघाटगे)
शासनाचे उप सचिव, वित्त विभाग

प्रति,

१) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)
२) सर्व सह सचिव/ उप सचिव, अवर सचिव/ कक्ष अधिकारी,सर्व व्यय कार्यासने, वित्त विभाग
३) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
४) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा), मुंबई
५) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
६) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा), नागपूर
७) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई /वांद्रे
९) निवासी लेखा अधिकारी,मुंबई.
१०) निवड नस्ती (अर्थोपाय).